# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३२६** **दिनांक २०/११/२०२१**

## सोशल मिडीया Instagram ID - "mentor_mayur"या नावाने अकाऊंट बनवुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीस पकडण्यात सायबर गुन्हे शाखेस यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नवघर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार यांची **Instagram ID** mentor_mayur या इन्स्टाग्राम आयडीवरुन Investment 2k returns 10 k, Returns will be given in just 10 mins, if any one interested then msg me " Ready to invest 2k" Offer valid till midnight अशी जाहीरात प्रसारित करुन त्याद्वारे ७०००/- रुपयांची रक्कम स्विकारुन फसवणुक केल्याबाबतची तक्रार सायबर गुन्हे शाखा येथे दिनांक २२/१०/२०२१ रोजी दाखल होती.

सायबर गुन्हे शाखेने तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीबाबत तात्काळ चौकशी करुन तांत्रीक माहीतीच्या आधारे दिनांक १९/११/२०२१ रोजी संशयित नामे १) मयुर अनिल पटवा, वय २६ वर्षे रा.लहेरी मेन्शन,३रा मजला,रुम नंबर ३०,२३६/४ एस वी पी रोड,खेतवाडी दुसरी लेन अलंकार सिनेमा समोर खेतवाडी मुंबई यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सदर प्रकार केल्याचे निष्पन्न झालेले आहे. तसेच त्यांचे मोबाईलचे विश्लेषण केले असता त्यामध्ये **Instagram ID** mentor_mayur याहे इन्स्टाग्राम अकाउंट लॉग ईन मिळून आले आहे.

तसेच त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याने खालील मोबाईल क्रमांक/खाते क्रमांक/युपीआय आयडी/इन्स्टाग्राम आयडी/ईमेल आयडी गुन्हा करण्यासाठी वापरले असल्याची माहिती दिली आहे.

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| ०१ | इन्स्टाग्राम आयडी **Instagram ID** | **"mentor_mayur"** प्रोफाईल मध्ये (mentor_mayur – BusinessMan, Studies in Stanford University, EARN MONEY, DM ME, ) असा संदेश लिहून ठेवला आहे. |
| ०२ | युपीआय आयडी | Bharatpe 09895405649@yesbankltd |
| ०३ | बँक खाते क्रमांक | बँक ऑफ इंडीया खाते क्रमांक 003910110001335 |
| ०४ | मोबाईल क्रमांक | 9895405649<br>7666375770 |
| ०४ | ईमेल आयडी | mayurpatwa77@gmail.com |

वरील इन्स्टाग्राम आयडी **"mentor_mayur"**वरुन लोकांना Investment 2k returns 10 k, Returns will be given in just 10 mins if any one interested then msg me " Ready to invest 2k" Offer valid till midnight असे जाहीरातीद्वारे आमिष दाखवुन त्यांना वरील युपीआय आयडीवर पैसे पाठविण्यास सांगुन सदरची रक्कम स्विकारुन फसवणूक करीत होता.

सदर संशयित आरोपीतास पुढील कायदेशीर कारवाई करीता नवघर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्याचे विरोधात गुन्हा नोंद क्रमांक ७८८/२०२१ कलम ४२०,४०६ भादंविसं, आयटी ॲक्ट ६६ (सी), ६६ (डी) अन्वये नोंद करण्यात आला आहे.

सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, Instagram ID"mentor_mayur"तसेच वरील युपीआय आयडी, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी व बँक खात्यांशी संबधित व्यवहार करुन गुंतवणुक करुन आर्थिक फसवणुक झालेली असल्यास नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोशि/२०७२ गणेश इलग, पोशि/१८१२ प्रविण आव्हाड, मपोशि/ पल्लवी निकम, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/माधुरी धिंडे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

- सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- 022-2811 0135
- सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- 900 488 0135
- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :-**cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

---oo---